# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 01/08/2023 (मंगळवार) सायंकाळ

---

## विनयभंग करणाऱ्या आरोपीतांना कोर्टातून शिक्षा

१) दिनांक ३१/०८/२०२३ रोजी मा. सेशन कोर्ट नागपुर यांनी पोलीस स्टेशन सावनेर अपराध क्र. ४७०/२०२२ कलम ३५४, ३५४ (अ), ३२३, ५०६ भादंवी सहकलम ८, १२ पोक्सो मध्ये **आरोपी क्र. १) गणेश उर्फ जरक्या सुरेश चौधरी वय ४२ वर्ष, रा. टाकळी भन्साळी** यांना सदर केस मध्ये कलम ३५४ भादंवी अन्वये ०२ वर्ष कारावास व ०९ हजार रुपये दंड, दंड न भरल्यास आरोपीला ०३ महीने साधी कैद ३५४ (अ) भादंवी मध्ये ०२ वर्ष कारावास कलम ३२३ भादवि. मध्ये ०१ वर्ष कारावास व ११,०००/– रु. दंड अशी शिक्षा मा. डि. जे.– १४ शेंडे मॅडम यांनी आरोपीला दिलेली आहे. मा.पोलीस अधिक्षक साहेब, नागपूर ग्रामीण मा. अपर पोलीस अधिक्षक साहेब नागपूर ग्रामीण यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे श्री. रविंद्र मानकर ठाणेदार सावनेर, तपास अधिकारी महिला पोलीस उपनिरीक्षक प्रियंका गेडाम मॅडम पो.स्टे. कळमेश्वर, पैरवी अधिकारी पोलीस हवालदार मधुकर आदमने ब. नं. ३७६ यांचे कडुन साक्षदारास ब्रिफ करण्यात आले व सरकारी वकील ए.पी.पी. गवळी मॅडम यांनी आपली बाजू मांडली.

२) तसेच मा. जे. एम. एफ. सी. भरड सा. कोर्ट सावनेर यांनी पोलीस स्टेशन सावनेर अपराध क्र. ४५२/२०१८ कलम ३५४, ३५४(अ), ५०६, ३४ भादंवी मध्ये **आरोपी क्र. १) वासुदेव नत्थुजी झलके, वय ५० वर्ष, रा. सावगी २) सुभाष शंकरराव मछले वय ४८ वर्ष रा. सावनेर** यांना सदर केस मध्ये कलम ३५४ भादंवी अन्वये ०१ वर्ष कारावास व ०२ हजार रुपये प्रत्येकी दंड, दंड न भरल्यास आरोपीला ०७ दिवसाची साधी कैद अशी शिक्षा दोन्ही आरोपीला दिलेली आहे. मा. पोलीस अधिक्षक साहेब, ना. ग्रा. मा. अपर पोलीस अधिक्षक साहेब, ना. ग्रा. यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे श्री. रविंद्र मानकर ठाणेदार सावनेर, तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक विवेक देशमुख, पैरवी अधिकारी पोलीस नायक सुधाकर शेंदरे यांचे कडुन साक्षदारास ब्रिफ करण्यात आले व सरकारी वकील अर्चना चालाक मॅडम यांनी आपली बाजू मांडली पो.स्टे. सावनेर येथे दाखल असलेल्या दोन गुन्हयात मा. कोर्टाने शिक्षा सुनावलेली आहे.

## चोरी

१) पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत बोरडा शिवार टोल प्लाजाचे मागे दिनांक २८/०७/२०२३ चे १७/०० वा. ते दि. ३१/०७/२०२३ चे ११/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सागर गुप्ता वाघमारे, वय २७ वर्ष रा. कोराडी यांना दिनांक ३१/०७/२०२३ रोजी सकाळी ११:०० वा. दरम्यान वरीष्ठ तंत्रज्ञ यांनी फोन व्दारे कळविले की घटनास्थळी ३३ के. व्ही गोंडेगाव सप्लाय देणारी विजेची तार ६० मीटर किंमती अंदाजे ७०,०००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार गणेश पाल ब. नं. ३६० हे करीत आहे.

**२) पो.स्टे. खापरखेडा** :— अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील वलनी माईन येथे दिनांक ३०/०७/२०२३ चे ०३/०० वा. ते दिनांक ३१/०७/२०२३ चे १६/०० वा. दरम्यान यातील इंडस मोबाईल टावर कंपनीचा वलनी माईन येथील टॉवर जवळील खुल्या जागेमध्ये ठेवलेले जनरेटरचे दार तोडून त्यामधील अल्टरनेटर सेल बॅटरी इंजिन ब्लॉक पिस्टन रोटर रेडिएटर चार्जिंग अल्टरनेटर रेडिएटर व लागून असलेला १५ मीटरचा केबल असे एकूण अंदाजे किंमती ४०,०००/— रुपयांचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— आशिष नरसिंगराव खंडागळे, वय ३५ वर्ष, रा. प्लॉट क्रमांक २०२ गणेश अपार्टमेंट कोतवाल नगर प्रताप नगर नागपूर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक पिसे पोस्टे खापरखेडा मो. क्र. ९८८१७७७३४४८ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**